क्रमांक : १४६०३ /ह-२
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २३/०९/२०२५

## :: प रि प त्र क ::

**विषय :- मा.सदस्यांना देण्यात आलेल्या राज्यांतर्गत/राज्याबाहेरील रेल्वे कुपन पुस्तकांचा हिशेब सादर करण्याबाबत तसेच दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ रोजी विधीग्राह्यता संपणाऱ्या रेल्वे कुपन पुस्तिका जमा करणेबाबत..**

विधानमंडळाच्या सर्व सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामूल्य प्रवास) नियम, १९६५ मधील नियम ३ (अ) व ३ (ब) नुसार राज्यांतर्गत व राज्याबाहेरील प्रवासासाठी मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्यांना प्रत्येकी ३ कुपन्स पुस्तकांचा संच उपलब्ध करुन दिला जातो. उपरोक्त नियमामध्ये वरीलप्रमाणे उपलब्ध करुन दिलेल्या ३ कुपन पुस्तकांच्या संचाच्या वापराबाबतचा हिशेब सादर केल्यानंतरच नविन रेल्वे कुपन पुस्तिका उपलब्ध करुन देण्याबाबत तरतूद आहे. तथापि, सदर कुपन पुस्तकांच्या वापराबाबतचा हिशेब सादर न करताच काही सन्मा.सदस्यांकडून पुन्हा नवीन कुपन पुस्तकांची आग्रही मागणी वारंवार या सचिवालयाकडे केली जाते. त्यामुळे सर्व सन्मा. सदस्यांना कळविण्यात येते की, आपणाकडे प्रलंबित असलेल्या रेल्वे कुपन पुस्तकांचा हिशेब सादर केल्यानंतरच नविन कुपन पुस्तिका आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल.

तसेच आपणास असेही कळविण्यात येते की, या सचिवालयाकडून छापण्यात आलेल्या काही रेल्वे कुपन पुस्तकांचा विधीग्राहयता कालावधी दिनांक **३१ ऑक्टोबर**, २०२५ रोजी संपुष्टात येत आहे. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामूल्य प्रवास) नियम, १९६५ च्या नियम १९ अन्वये विधीग्राहयता कालावधी संपुष्टात आलेली रेल्वे कुपन्स एक महिन्याच्या आत रेल्वेकडे जमा केल्यास त्यावर रेल्वेकडून परतावा अनुज्ञेय आहे.

सबब, दिनांक **३१ ऑक्टोबर**, २०२५ रोजी विधीग्राहयता कालावधी संपुष्टात येत असलेली रेल्वे कुपन्स आपणाकडे शिल्लक असल्यास ती जास्तीत जास्त दिनांक **१० नोव्हेंबर**, २०२५ रोजीपर्यंत या सचिवालयात जमा करावी. त्यानंतर प्राप्त होणारी रेल्वे कुपन्स स्वीकारली जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी, हि विनंती.

प्रा कुळकर्णी
(प्राजक्ता कुळकर्णी)
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत : महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य.**